प्रत्येक क्षण हा काहीतरी
शिकवणारा असतो,
त्यामुळे आजच्या अडचणी
उद्याच्या यशाचा
पाया रचतील यावर विश्वास
ठेवा.

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १४४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.०५ जानेवारी २०२५

## धक्कादायक ! खरेदी केंद्रावरच शेतकऱ्याने अंगावर घेतले पेट्रोल!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, बुलडाणा :** जिल्ह्यातील हमी केंद्रावरील शेतमालाची खरेदी हजरो शेतकऱ्यांसाठी अडचणीची आणि संतापाची बाब ठरली. याचा उद्रेक आज चिखली तालुक्यातील सोमठाणा हमी केंद्रावर झाला. तीन दिवसापासून सोयाबीन खरेदी राखडलेल्या एका शेतकऱ्याने केंद्रावरच अंगावर पेट्रोल ओतून घेतले! तो जीवाचे काही बरेवाईट करून घेईल त्यापूर्वी सोबतच्या शेतकऱ्यांनी त्याला वेळीच रोखल्याने सांभाव्य भीषण अनर्थ टळला. ज्ञानेश्वर दिनकर सावळे (राहणार डोंगरशेवली तालुका चिखली, जिल्हा बुलढाणा) असे संतप्त आणि अडवणुकीम ुळे जीवावर उदार झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

हमीभाव केंद्रावर तीन दिवसांपासून सोयाबीन पडून होती, सोयाबीन खरेदीसाठी विलंब लागत असल्याने त्रस्त झालेल्या शेतकऱ्याने अंगावर पेट्रोल ओतून घेतले. हम ीभाव केंद्रावर उपस्थित इतर सहकारी शेतकऱ्यांनी वेळीच रोखल्याने पुढील अनर्थ टळला. चिखली तालुक्यातील सोमठाणा येथील अहिल्याबाई सहकारी संस्थेच्या हमीभाव



केंद्रावर हा प्रकार आज, ४ जानेवारीला दुपारी अडीच वाजताच्या सुमारास घडला.

**काय झालं नेमकं?**

प्राप्त माहितीनुसार बारदाना उपलब्ध नसल्याने हमीभाव केंद्रावरील सोयाबीन खरेदी गेल्या दोन ते तीन दिवसांपासून रखडली होती. डोंगरशेवली येथील शेतकरी ज्ञानेश्वर दिनकर सावळे यांनी त्यांच्या शेतातील अंदाजे ५० क्विंटल सोयाबीन सोमठाणा येथील 'आम्ही भाऊ केंद्रा'वर आणली होती. मात्र गेल्या ३ दिवसांपासून सोयाबीन गाडीत तशीच पडून होती. सोयाबीन खरेदी होत नसल्याने त्रस्त झालेल्या शेतकऱ्याचा अखेर धीर सुटला आणि त्याने टोकाचे पाऊल उचलले. त्यांनी अंगावर पेट्रोल ओतून घेत स्वतःला पेटवून घेण्याचा प्रयत्न केला.

ही बाब सोबतच्या सहकारी शेतकऱ्यांच्या लक्षात आल्याने शेतकऱ्यांनी ज्ञानेश्वर सावळे यांना रोखले यामुळे पुढील अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच चिखली पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी यांचे पथक घटनास्थळी पोहोचले. शेतकरी नेते विनायक सरनाईक हेदेखील घटनास्थळी पोहोचले होते. वृत्त लिहिस्तोवर पुढील कारवाई सुरू आहे.

**मी मेलो तरी बेहत्तर...**

मी मेलो तरी चालेल पण बाकीच्या शेतकऱ्यांचा फायदा झाला पाहिजे असे म्हणत ज्ञानेश्वर सावळे यांनी स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतून घेतले. आमच्या मालाची यांना किंमत नाही, किती दिवस संयम ठेवायचा? आता संयम सुटला आहे, असेही ज्ञानेश्वर सावळे यांनी म्हटले आहे.

## राधाकृष्ण विखे यांना मराठवाडा कृषी विद्यापीठाचा 'डॉक्टर ऑफ सायन्स' सन्मान



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.४, अहिल्यानगर :** जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांना परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही मानाची पदवी देवून सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठाच्या २६ व्या पदवीदान समारंभात ही पदवी प्रदान केली जाणार आहे. मंत्री विखे यांनी शेती, सहकार, शिक्षण या क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेवून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने त्यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' या पदवीने सन्मानित करण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मंत्री विखे यांना 'जीवनगौरव' व राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवी देवून सन्मानित केले आहे. विखे यांनी अनेक महत्त्वपूर्ण पदांवर काम करून, सामाजिक हिताचे निर्णय घेतले. कृषी व पणन मंत्री असताना शेतकरी हिताच्या निर्णयांमुळे कृषी क्षेत्राला नवी दिशा मिळाली. शेतकरी ते ग्राहक योजना राज्यात प्रथम सुरू करून शेतीमालाला नवी बाजारपेठ मिळवून दिली. शेतकरी गट आणि फार्मर्स प्रोड्युसर कंपन्यांना त्यांनी मंत्रिपदाच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले होत पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि लोकनेते पद्मभूषण डॉ बाळासाहेब विखे पाटील यांचा वारसा चालवताना सहकारी साखर कारखानदारी, सहकारी बँक व पतसंस्था चळवळीलाही पाठबळ देत सहकार क्षेत्रामध्ये मोठे योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करतानाच कौशल्य शिक्षणालाही त्यांनी प्राधान्य दिले. आरोग्याच्या सुविधाही त्यांनी निर्माण केल्या. जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून महिला बचत गटांची चळवळ सुरू करून महिलांना स्वावलंबी बनविण्याचे काम केले.

## टेम्पो-दुचाकीची समोरासमोर धडक ; दोघांची प्रकृती चिंताजनक



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.४, नांदेड :** अर्धापूर ते वसमत मार्गे जाणाऱ्या एक दुचाकी आणि टेम्पोची सम ोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात दुचाकीवरील तीन जण जखमी झाले आहेत. यातील दोघांची प्रकृती चिंताजनक असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात शुक्रवारी रात्री साडेआठ वाजताचे सुमारास सांगवी (बु.) जवळील अण्णा पेट्रोल पंपाजवळ घडला.

अर्धापूर-वसमत रोडचे काम गेल्या अनेक दिवसांपासुन रस्त्याचे अतिशय संथगतीने काम सुरू आहे. या रस्त्यावर अनेक ठिकाणी एकेरी वाहतूक करण्यात आल्याने येथे नेहमीच अपघातांचे प्रमाण वाढले आहे. त्यातच शुक्रवारी दि.३ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास दुचाकी क्रं. एम. एच. - ०३ - बी. आर. ९८१४ ला समोरून येणाऱ्या टेम्पो क्रं. एम. एच.- १६ ए. ई. ७४४७ ची समोरासमोर धडक झाली. टेम्पोच्या धडकेत दुचाकी लांबवर घासत गेली आणि दुचाकीवरील शेख महंम्मद शेख युसूफ (वय २० वर्षे ), शेख अफ्रोज शेख जिकरिया (वय २० वर्षे) या दोघांना जबरदस्त मार लागल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक आहे तर शैलेश लांडगे (वय २१ वर्षे ) हा तरूण गंभीर जखमी झाला आहे. तिघेही मदीना चौक वसमत येथील रहिवाशी आहेत. या घटनेची माहिती मिळताच नरेंद्रचार्य महाराज रुग्णवाहिका चालक राजू पाचंगे यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना नांदेड विष्णूपूरी येथील शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले आहे.

## क्षुल्लक कारणावरून अल्पवयीन मुलाची दगडाने ठेचून हत्या




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, चंद्रपूर :** शहरातील बाबुपेठ परिसरात तन्मय जावेद शेख या १७ वर्षीय अल्पवयीन मुलाची दुचाकीला कट मारला या शुल्लक कारणावरून दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना शुक्रवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी शहर पोलिसांनी एका पोलीस शिपायाच्या मुलासह तीन आरोपींना अटक केली आहे, तर एक आरोपी अद्याप पसार आहे.

मृत तन्मय हा बाबुपेठ येथील रहिवासी होता. सूत्राच्या माहितीनुसार तन्मय शेख हा रात्री नऊ वाजताच्या सुमारास घराकडे जात होता. त्याच वेळी काही तरुण तिथूनच जात होते. रस्त्यात काहींच्या दुचाकी वाहनाला तन्मयच्या वाहनाचा कट लागल्याने चार अल्पवयीन मुलांनी तन्मयला कट का मारली म्हणून जबर मारहाण केली. त्यानंतर त्याला बाबूपेठ रेल्वे फाटकजवळील रेल्वे पटरीजवळ नेण्यात आले. तिथेही त्याला मारहाण करण्यात आली. त्यानंतर दगडाने ठेचून त्याची अतिशय निर्घृणपणे हत्या करण्यात आली. आरोपीनी अत्यंत क्रूरतेने तन्मयची हत्या केली असून त्याचा चेहराही ओळखणे कठीण झाले आहे. शहर पोलिसांनी तात्काळ कारवाई करीत आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणातील फरार आरोपीचा शोध सुरू आहे. एका पोलीस शिपायचा मुलगाही या हत्या प्रकरणात आरोपी आहे. मागील काही दिवसांत जिल्ह्यात हत्यांचे सत्र वाढले आहे. सातत्याने हत्या होत असून देशी कट्टे, तलवारी व इतर शस्त्र मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने पोलिसांच्या कामगिरीवर प्रश्न निर्माण झाले आहे.

## अहिल्यानगरमध्ये ठाकरे गटाला खिंडार पदाधिकाऱ्यांचा शिंदे गटात प्रवेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.४, अहिल्यानगर :** शिवसेनेच्या ठाकरे गटास जिल्ह्यात खिंडार पडण्यास सुरुवात झाली आहे. शहरातील तीन म ाजी नगरसेवकांसह पाच पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी सायंकाळी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला. ठाकरे गटाच्या आणखी काही पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याशी चर्चा करून रविवारी प्रवेश निश्चित केला आहे.

शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे व शहर प्रमुख सचिन जाधव यांनी आज झालेल्या पक्षप्रवेशाची माहिती दिली. प्रवेश करणारे माजी नगरसेवक दत्ता जाधव यांनीही या प्रवेशाला दुजोरा दिला. शहरातील आणखी काही माजी नगरसेवक शिंदे गटाच्या संपर्कात असून,



लवकरच ते प्रवेश करतील. यासाठी नगर शहरात उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम आयोजित केला जाणार असल्याचे शहरप्रमुख जाधव यांनी सांगितले. गेल्या काही दिवसांपासून ठाकरे गटाचे पदाधिकारी शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचा घाट घातला जात होता. दोन्ही बाजूंनी चर्चा, बैठका सुरू होत्या. विधानसभा निवडणुकीपासून ठाकरे गटाचे पदाधिकारी नाराज आहेत. श्रीगोंद्याच्या बदल्यात ठाकरे गटाने अहिल्यानगर शहर व पारनेरच्या जागेवर पाणी सोडल्याचा असंतोष पदाधिकारी व कार्यकर्त्यांत होता. खासदार संजय राऊत यांच्या विधानसभा निवडणूक कालावधीतील कार्यपद्धतीने असंतोषाचा भडका उडाला होता. दत्ता जाधव, प्रशांत गायकवाड, दीपक खैरे या माजी नगरसेवकांसह अंबिका महिला बँकेच्या अध्यक्ष शोभना संजय चव्हाण यांनी पक्षप्रवेश केला. त्यांच्यासह माजी शहरप्रमुख दिलीप सातपुते यांचीही घरवापसी झाली आहे. सातपुते पूर्वी शिंदे गटाचे शहरप्रमुख होते.

याशिवाय पक्षाचे उपजिल्हाप्रमुख व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संदेश कार्ले, शरद झोडगे, माजी सभापती राम दास भोर, पंचायत समिती माजी सदस्य गोविंद कोकाटे आदींनीही पक्षप्रवेशासाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याशी चर्चा केली. येत्या दोन दिवसांत त्यांचा पक्षप्रवेश होईल, असे सांगितले जाते. संदेश कार्ले यांनी गेल्या विधानसभा निवडणुकीत बंडखोर करत अपक्ष निवडणूक लढवली होती. त्याचा फटका पारनेरमधील उम ेदवार राणीताई लंके यांना बसला.

## शिव पानंद शेतरस्त्यांच्या प्रश्नांवर १७ फेब्रुवारीला पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.७ सुपा (अहिल्यानगर) :** शेतकऱ्यांचा शेतरस्त्यांचा प्रश्न अद्याप जैसे थेच राहीला असून या महाराजस्व अभियानाची दखल घेत इतर जिल्ह्यांम ध्ये तहसिल कार्यालयांकडून यशस्वी अभियान पार पडत आहे.

परंतु अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, नेवासा आदी तालुके सोडता कुठेही यावर प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात आलेली नाही, महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून राज्यभर आंदोलन चालु असताना श्रीगोंदा तहसिल कार्यालयाकडून विशेष सहकार्य लाभत आहे या तालुक्याला म ॉडेल म्हणून घोषीत करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष कृती आराखडा तयार करावा, तहसिलवर शुन्य रस्ता केसेस ठेवाव्यात, भूमिअभिलेख कार्यालयाम धे असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा तुटवडा भरून काढणे, उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर येथे पारनेर तालुक्यातील दाखल निकालानुसार ६० दिवसांच्या आत शेतरस्ते खुले करून द्यावेत, शिव पानंद शेतरस्ते खुले करताना शासकीय कामात अडथळा आणल्या कारणाने संबंधितांवर तातडीने फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करून दंड आकारण्यात यावा, अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शिव पाणंद शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करण्यासह विविध मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी चळवळीच्या वतीने जिल्हाधिकारी यांना दिले असुन वरिल मागण्या मान्य न झाल्यास दि. १७ फ ेब्रुवारी रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्याचा इशारा प्रशासनास दिला आहे.

विभाजनानंतर शेतजमिनींची होत चाललेली तुकडेवारी यामुळे शेतरस्त्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला असुन अहिल्यानगर जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ते खुले करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर महाराष्ट्र शिवपानंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी यापूर्वी पेरू वाटप आंदोलन करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी विशेष मोहीम हाती घेवून जिल्ह्यात महाराजस्व अभियानाचे परिपत्रक काढून कालबद्ध कार्यक्रम राबवण्याच्या सुचना तहसिल कार्यालयांना दिल्या होत्या परंतू तहसिल कार्यालयांकडून या अभियानाला केराची टोपली दाखवण्यात आली आहे.



### शेतरस्त्यांसाठी शेतकऱ्यांना तारीख पे तारीख बंद करा- शरद पवळे

**आता रस्त्याची लढाई रस्त्यावर**

अहिल्यानगर जिल्ह्यात पुन्हा नव्याने महाराजस्व अभियान राबवावे, तहसिल कार्यालयांकडून शेतकऱ्यांची होणारी विवंचना, शेतरस्ता केसेस सुनावणीतील दिरंगाई, शेतरस्त्यांअभावी पडीक राहणाऱ्या भुधारकांना विनाअट नुकसान भरपाई मिळावी त्याचबरोबर तहसिल कार्यालयात शेतरस्ता केसेसमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी शेतकऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांच्या समोर तालुका प्रशासनाची बैठक लावावी आदी मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने शरद पवळे, दादासाहेब जंगले पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चाचा ईशारा दिला आहे.

**- पवळे, दादासाहेब जंगले पाटील.**

## संपादकीय



### लाडक्या बहिणींनो आता एकच लाभ मिळणार...




विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार स्थापन झालं. सरकार स्थापन झाल्यानंतर लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे. मात्र, यातही अद्याप काही महिलांना डिसेंबरचा हप्ता जमा झाला असल्याचा आरोप करण्यात येत आहे. मात्र, आता काही लाभार्थी महिला अपात्र ठरण्याची शक्यता आहे. याचं कारण म्हणजे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत आता निकष लावण्यात येणार असल्याचं बोललं जात आहे. एवढंच नाही तर 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेत निकष डावलून लाभ घेतलेल्यांवर कारवाई सुरू झाली आहे.

धुळे जिल्ह्यात एका लाभार्थी महिलेला मिळालेले साडेसात हजार रुपये सरकारच्या तिजोरीत पुन्हा जमा करण्यात आले आहेत. त्यामुळे आता 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेला निकषाची कात्री लागणार असल्याचं बोललं जात आहे. यातच नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ घेता येणार की नाही? याबाबत आता कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी मोठं विधान केलं आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यायचा की नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ घ्यायचा? हे महिलांनी ठरवावं, असं विधान लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केलं आहे. ते आज (४ जानेवारी) पत्रकार परिषदेत बोलत होते.

**माणिकराव कोकाटे काय म्हणाले?**

नमो शेतकरी महासन्मान योजना आणि लाडकी बहीण योजना असा कोणता लाभ घेता येईल किंवा दोन्ही योजनेचा लाभ घेता येईल का? असा प्रश्न पत्रकार परिषदेत कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना विचारण्यात आला. यावर उत्तर देताना कृषीमंत्री कोकाटे यांनी म्हटलं की, एका वेळी दोन योजनांचा लाभ घेता येत नाही. हा नियम आहे. त्यामुळे महिलांनी हा निर्णय घ्यायचा आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यायचा की नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ घ्यायचा? हे त्यांनी ठरवायचं आहे, असं माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे.

**'दोन्ही पैकी एकाच योजनेत सहभाग नोंदवा'**

दरम्यान, लाडकी बहीण योजनेचा लाभ महिला घेत असतील तर शेतकरी महासन्मान योजनेचे पैसे वजा होतील, असा काही निर्णय झालेला आहे का? असं विचारलं असता कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं की, असा निर्णय झालेला नाही. मात्र, दोन्ही पैकी एका योजनेत महिलांनी सहभाग नोंदवावा, असं कोकाटे यांनी स्पष्ट केलं. कोकाटे पुढे म्हणाले, सरकारच्या योजनेत एका माणसाला दोन योजनांचा फायदा घेता येतो का? नाही घेता येत. एक शेतकरी एकाच जमीनीवर दोन बँकेकडून कर्ज घेऊ शकतो का? नाही घेऊ शकत. मग जे नियम इतरांना आहेत तेच नियम या ठिकाणीही लागू होतील. योजना वेगळ्या असल्या तरीही. अन्यथा दोन योजनांचा लाभ महिला घेऊ शकतील असा जीआर सरकारला काढावा लागेल, असंही कृषीमंत्री माणिकराव कोकाटे म्हणाले आहेत.

# पाकिस्तान - तालिबान संघर्ष वाढला !!



पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात तालिबानचे सरकार भारताशी समोरासमोर युद्ध करणे शक्य नसल्याने पाकिस्तानने दहशतवादाला खतपाणी घालून भारतात अराजकता माजवण्याचा प्रयत्न केला. विशेषतः जम्मू काश्मीर मध्ये त्यांनी दहशतवाद्यांना हाताशी धरून जम्मू काश्मीर कायम अस्थिर करण्याचा प्रयत्न केला. भारताशी लढण्यासाठी ज्या दहशतवादाचा पाकिस्तानने शस्त्र म्हणून वापर केला तेच दहशतवादाचे शस्त्र आता त्यांच्यावर बुमरांग होत आहे.

तालिबान ही दहशतवादी संघटना आहे हे सर्व जगाने मान्य केले आहे. ज्या वेळी तालिबानने अफगाणिस्तानवर कब्जा मिळवला त्यावेळी जगातील बहुतेक देशांनी तालिबानच्या सरकारला मान्यता देण्यास नकार दिला मात्र पाकिस्तानने तालिबानला सुरवातीपासूनच समर्थन दिले. अफगाणिस्तानातील तालिबानी सरकारला मान्यता देणारा पाकिस्तान हा जगातील पहिला देश होता अर्थात त्यामागे त्यांचा वेगळा डाव होता. तालिबानला मान्यता दिल्यास तालिबानला सोबत घेऊन भारतात घुसखोरी करून भारतात अस्थिरता माजवता येईल तसेच जर भविष्यात भारताविरुद्ध लढाई झाली तर त्यात तालिबानची मदत घेता येईल हा पाकिस्तानचा डाव होता. आज मात्र त्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला असून तालिबानने भारताशी पंगा न घेता पाकिस्तानशीच पंगा घेत पाकिस्तानातच घुसखोरी सुरू केली. मागील वर्षी पाकिस्तान आणि अफगाणिस्तान सीमेवर प्रचंड तणाव निर्माण झाला होता. तालिबानने पाकिस्तानी हद्दीत प्रवेश करून पाकिस्तानच्या सीमावर्ती भागातील एका जिल्ह्यात सरकार स्थापन केले होते.

याची कबुली खैबर पखतूनच्या राज्यपालांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली होती. पाकिस्तानच्या हातून हा भाग निघून गेल्याने पाकिस्तानमध्ये खळबळ माजली होती. हा होता या दोन्ही देशातील तणावाचा पहिला अंक. आता दोन्ही देशातील तणावाचा दुसरा अंक सुरू झाला आहे. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या सीमावर्ती भागात हवाई हल्ले करून २ डझनाहून अधिक तालीबानिंना ठार केले. पाकिस्तानच्या या हवाई हल्ल्याला तालिबानने ही जशास तसे उत्तर दिले. अफगाणिस्तानने पाक अफगाण सीमेवर तैनात असलेल्या १९ पाकिस्तानी रेंजर्सला ठार केले इतकेच नाही तर अफगाणिस्तानने पाकिस्तानच्या २ चौक्यांवर देखील ताबा मिळवला. यावरून हे स्पष्ट झाले की आता पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात युद्ध सुरू झाले आहे. हा संघर्ष नजीकच्या काळात थांबेल असे वाटत नाही उलट वाढतच जाईल. पाकिस्तानने अफगाणिस्तानला कमी लेखून मोठी चूक केली आहे. पाकिस्तानकडे अत्याधुनिक शस्त्रसाठा आणि अफगाणिस्तानपेक्षा कैक पट अधिक सैन्य आहे. अफगाणिस्तानकडे आजही जुनेच शस्त्र असून त्यांची सैन्य संख्याही कमी आहे असे असले तरी तालिबानी सैन्याकडे जी जिद्द आहे ती पाकिस्तानी सैन्याकडे नाही. तालिबानी चिवट आणि लढाऊ आहेत.

त्यांनी याआधी रशिया आणि अमेरिकेलाही चिवट झुंज दिली आहे त्यामुळे त्यांनी पाकिस्तानला गुडघे टेकवायला लावले तर आश्चर्य वाटायला नको. वास्तविक अफगाणिस्तानात जेंव्हा तालिबानचे सरकार आले तेंव्हा दोन्ही देशात सौहार्दाचे वातावरण होते मात्र अल कायदाचा मोठा दहशतवादी अल जवाहिरी पाकिस्तानात मारला गेला. अमेरिकेने त्याला पाकिस्तानात घुसून मारले. या सर्व कारवाईत पाकिस्तानने अमेरिकेला मदत केली असा आरोप तालिबानने केला आणि तेथून या दोन्ही देशातील संबंध बिघडले. त्यात पाकिस्तानने पाकिस्तानात राहणाऱ्या अफगाणिस्तानी नागरिकांना देशातून हाकलण्यास सुरवात केल्याने हा तणाव आणखी वाढला आता तर हा तणाव पराकोटीचा वाढला आहे. भारताचा काश्मीर प्रांत बळकावण्यासाठी तालिबानचा वापर करता येईल असे पाकिस्तानला वाटले होते त्याच तालिबानने आता पाकिस्तानचाच भूभाग बळकावून पाकिस्तानला चांगलेच तोंडघशी पाडले आहे. भारतासाठी खणलेल्या खड्ड्यात पाकिस्तानच गाढला जाऊ लागला आहे यालाच म्हणतात जैसी करणी वैसी भरणी!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## नवी मुंबईत पोलिसाची हत्या !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, नवी मुंबई :** नवी मुंबईत नववर्षाच्या पहाटे पोलीस हवालदार विजय चव्हाण (४२) यांची दोन मारेकर्यांनी गळा दाबून हत्या केली. चव्हाण यांचा मृत्यु लोकल अपघातात झाला हे भासवण्यासाठी मारेकर्यांनी त्यांचा मृतदेह ट्रान्स हार्बर मार्गावरील रबाळे आणि घणसोली रेल्वे स्थानकांच्या दरम्यान लोकलपुढे रेल्वे रुळांवर फेकला.

मात्र मोटारमनच्या सर्तकर्तमुळे त्यांचा हा बनाव फसला. याप्रकरणी वाशी रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून ते मारेकर्यांचा कसून शोध घेत आहेत. रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन चव्हाण यांचा मृतदेह ताब्यात घेतला आणि पुढील तपास सुरू केला.

### कैदी नंबर..

अटक पूर्व जामीन
कशा साठी रे हवा
कधी तरी खायची
तुरुंगा मधली हवा

लहानग्या खोलीत
अनुभव येईल नवा
नंबरवरूनओळख
फाटा देतात नावा

कैदी ही एकजात
भेदाभेद न उरावा
गुन्ह्याचे प्रायश्चित्त
मिटून जाई दुरावा

एकसारखाचं ड्रेस
घालायचा रे भावा
सामुदायिक रित्या
पोटापुरतेचं रे जेवा

काम मिळे हाताला
भत्ता सुध्दा घ्यावा
ढेकूण डास सगळे
घेत राहतीलं चावा

तुरुंगामधून सुटता
बदल होई स्वभावा
पुन्हा ना तुरुंगवास
सुधारून जा भावा

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# ज्ञानज्योती सावित्रीबाई आणि विद्येची देवाच्या देवी सरस्वती



भारतात मुलींची पहिली शाळा सुरु करणाऱ्या शिक्षणतज्ञ, समाज सुधारक आणि कवयित्री सावित्रीबाई फुले यांची जयंती नुकतीच पार पडली. सावित्रीबाईंना स्त्रीवादाची जननी असेही म्हटले जाते. स्त्री आणि पुरुष यांच्या अधिकारांतील दरी मिटविण्याचे महत्कार्य त्याकाळी सावित्रीबाईंनी केले. स्त्रियांच्या अधिकारासाठी लढताना तत्कालीन समाजाकडून झालेला रोषही त्यांना सहन करावा लागला. स्त्री शिक्षणाला होत असलेला विरोध झुगारून सावित्रीबाईंनी स्वतः शिक्षण घेतले, शाळेत शिक्षिका म्हणून नोकरी करून त्या मुख्याध्यापिका झाल्या. मुलींना शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यासाठी १ जानेवारी १८४८ मध्ये पुण्यातील भीडेवाड्यात सावित्रीबाईंनी मुलींची पहिली शाळा सुरु केली, पुढील ४ वर्षांत त्यांनी १८ शाळा उघडल्या. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या महान योगदानाचे स्मरण म्हणून २०१५ मध्ये पुणे विद्यापीठाचे नामकरण 'सावित्रीबाई फुले विद्यापीठ' असे करण्यात आले. ३ जानेवारी हा त्यांचा जन्मदिन देशभरात बालिका दिन म्हणूनही साजरा केला जातो. शिक्षणक्षेत्रातील त्यातही स्त्री शिक्षणातील त्यांचे अमूल्य योगदान हा देश कधीही विसरणार नाही.

३ जानेवारीला सावित्रीबाई यांची जयंती देशभरात साजरी झाली. यानिमित्ताने अनेक ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सावित्रीबाई यांची जयंती जवळ आली की काही समाजविघातक मंडळींकडून समाजात विष पेरण्याचे काम चालू होते, ज्यामध्ये काही राजकीय मंडळीही आघाडीवर असतात. सावित्रीबाई यांचे गुणगान गाताना ही मंडळी जाणीवपूर्वक देवी सरस्वतीवर अश्लाघ्य भाषेत टीका टिपणी करतात, समस्त शाळांतून देवी सरस्वतीची चित्रे आणि मुर्त्या काढून त्या ठिकाणी सावित्रीबाई फुले यांची छायाचित्रे आणि मुर्त्या लावण्याची भाषा केली जाते. या मंडळींचा ब्राह्मण समाजाबद्दल असलेला आकस असा देवी देवतांवर काढला जात असल्याचे पाहिल्यावर यांच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते. 'देवी सरस्वतीचे शिक्षणक्षेत्रातील योगदान काय आहे ?' 'स्त्री शिक्षणासाठी त्यांनी काय केले ?' येथपासून तर काही महाभाग देवी सरस्वतीचे चारित्र्यहनन करण्याचाही यानिमित्ताने प्रयत्न करतात. राष्ट्रीय जनता दलाचे आमदार फतेह बहादूर कुशवाह यांनी नुकतेच 'देवी सरस्वती चारित्र्यहीन असल्याने तिची पूजा करू नये' असे फुत्कार काढून हिंदूंना डिवचण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. यापूर्वीही कुशवाह यांनी देवी दुर्गा काल्पनिक असल्याचे विधान करून हिंदूंचा रोष ओढवून घेतला होता. सावित्रीबाईंचे गुणगान गाताना हिंदू धर्मातील देवी देवतांविषयी प्रकट केला जात असलेला रोष पाहिल्यावर या मंडळींनी सावित्रीबाई खरंच अभ्यासल्या आहेत का असा प्रश्न पडतो.

हिंदू धर्मात देवी सरस्वतींना विद्या आणि कला यांची देवता मानले जाते. तिच्या भावपूर्ण उपासनेने उपासकाची बुद्धी सात्त्विक बनल्याने त्याला विविध प्रकारच्या कला आणि ज्ञान प्राप्त होते. बुद्धीने जे ग्रहण केले ते शब्दबद्ध करण्याचे काम देवी सरस्वतीचे आहे. देवी सरस्वतींना संत ज्ञानेश्वरांनी 'अभिनव वाग्विलासिनी' तर श्री समर्थ रामदासस्वामी यांनी 'शब्द मूळ वाग्देवता' असे म्हटले आहे. ही विद्येची देवता आहे. श्री सरस्वती देवीला शारदाही म्हटले जाते. कुठल्याही कलेची उपासना आरंभ करताना श्री गणेश आवाहनानंतर देवी सरस्वतींचेही आवाहन केले जाते. शाळांमध्ये 'या कुंदेंदु तुषार हार धवला....' या श्लोकाने देवी सरस्वतीचे आवाहन केले जाते. विजया दशमीच्या दिवशी पाटीवर श्री सरस्वतीचे प्रतीकात्मक चित्र काढून वह्या पुस्तके पुजण्याची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून अविरत सुरु आहे. शाळांना विद्यामंदिर म्हणजेच देवी सरस्वतीचे मंदिर असेही म्हटले जाते. इतिहासतज्ञ पार्थ बावसकर यांनी सखोल अभ्यास केल्यावर त्यांच्या लक्षात आले की स्वतः सावित्रीबाई सरस्वतीदेवींना आदरस्थानी मानत होत्या. सावित्रीबाईंनी आपल्या 'काव्यफुले' या काव्यसंग्रहात शाळेचा उल्लेख देवी सरस्वतीचा दरबार असा केला आहे. या काव्यसंग्रहातील खालील कवितेत हा उल्लेख स्पष्ट आढळतो.

सरस्वतीचा दरबार खुला जाहला पाहू चला
शाळेमधुनी शिकूनी घेऊ ज्ञान मिळवू चला ग चला
सरस्वतीच्या या दरबारात शिक्षण घेणे जाऊ चला
विद्यादेवीस प्रसन्न करुनी वर मागू तिजला चला

स्वतः सावित्रीबाईंनी आपल्या काव्यात देवी सरस्वतीचा उल्लेख 'विद्येची देवता' असा करून देवी सरस्वतीवर टीका करून आपल्या अल्प बुद्धीच्या परिचय करून देणाऱ्यांची तोंडे शिवली आहेत. या चार ओळींतून विद्येच्या देवतेवरील त्यांची श्रद्धाही दिसून येते. सावित्रीबाई स्वतः आस्तिक असल्याचेही या काव्यसंग्रहाचे वाचन केल्यावर लक्षात येते. त्यामुळे सावित्रीबाईंच्या नावाने नास्तिकतावादाचा पुरस्कार करण्याचा, लोकांची माथी भडकावण्याचा, विद्यार्थ्यांची दिशाभूल करण्याचा जो प्रयत्न केला जात आहे तो आधी तो बंद करायला हवा. सावित्रीबाईंचे गुणगान गात असताना देवी सरस्वतींवर खालच्या स्तरावर होत असलेली टीका पाहिल्यावर आज सावित्रीबाई असत्या तर अशा टीकाकारांच्या कानशिलात दोन लगावल्यावाचून शांत राहिल्या नसत्या. सावित्रीबाई फुलेंविषयी आज समस्त भारतीयांना आदर आणि अभिमान आहे, म्हणूनच आज प्रत्येक शाळेमध्ये सावित्रीबाई यांची तसबीर लावलेली दिसते. याचाअर्थ देवी सरस्वतीची तसबीर काढायला हवी असा होत नाही, हे टीकाकारांच्या लक्षात येईल का ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

## जगद्गुरु स्वामी नरेंद्रचार्यजी महाराज संस्थानाच्यावतीने बिलोलीत रक्तदान महायज्ञ




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०४, नांदेड :** अनंत श्री विभुषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्रचार्यजी महाराज संस्थान नाणीजधाम यांच्या वतिने उपजिल्हारुग्णालय बिलोली येथे शनिवार, दि.०४ जानेवारी २०२५ रोजी आयोजित रक्तदान शिबीरात दोनशे रक्तदात्यानी रक्तदान केले. अनंत श्री विभुषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्रचार्यजी महाराज मठसंस्थान नाणीजधाम यांच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यंदा ही दिनांक ०४ जानेवारी ते १९ जानेवारी २०२५ पर्यंत रक्तदान महायज्ञाचे आयोजन करुन विविध आजारांच्या रुग्णांना नाव गरजवंताला वेळोवेळी रक्ताची मदत व्हावी. हा सामाजिक दृष्टिकोन लक्षात घेऊन गेल्या अनेक वर्षांपासुन देशपातळीवर रक्तदान शिबिरे आयोजित केली जातात. त्या अनुषंगाने बिलोली शहरात दि.०४ जानेवारी २०२५ रोजी उपजिल्हा रुग्णालय बिलोली येथे आयोजीत रक्तदान महायज्ञात दोनशे दानशुर रक्तदात्यांनी रक्तदान केले. विशेष बाब म्हणजे महिलांनी सकाळ पासून रांगा लावून उत्सफुर्तपणे मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. यावेळी दानशुर रक्तदात्यांना भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे राष्ट्रीय सरचिटणीस राजू पाटील, शिंपाळकर जिल्हाध्यक्ष शंकरराव मावलगे, सामाजिक कार्यकर्ते सय्यद रियाज इंजि. विषेक चंचलवाड, राजु पानकर यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. हे रक्तदान महायज्ञ यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जिल्हा सामाजिक उपक्रम प्रमुख अशोक चरकुलवार, जिल्हा देणगी प्रमुख दत्तात्रय बोडके, विशेष कार्यवाहक राजु पानकर, पिआरओ हाणमंत पा.कनशेटे, सत्संग अध्यक्षा शिलाबाई चुनडे, इजि.विषेक चंचलवाड, गंगाधर शिंदे, दता सांडगे, नागेश कोंडावार, दिपिका पांचाळ, अशा शिंदे, लक्ष्मीबाई केशोड, सुनिता मालुसरे , सावित्रा पानकर, गजानन चुनडे, मोगलाजी तुकडे, अशोक चरकुलवार, गणेश रोडोड, गंगाधर कोटलवार, भुजंग आगलावे, महेश निलावाड, नागेश कसलोड, विजय मुंडकर, साईनाथ बोडके, दत्तु कोषकेवार, मनोहर एडके, नागेश कसलोड, येलकुंचे रुद्रापुरकर यांच्यासह अनेक महिला पुरुष सांप्रदाय भक्तांनी परिश्रम घेतले.

## माळेगाव यात्रेत आज कुस्त्यांची दंगल; विविध स्पर्धेतील बक्षीस वितरण



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, नांदेड :** माळेगाव यात्रेत जिल्हा परिषदेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून आज रविवार, दिनांक ०५ जानेवारी २०२५ रोजी

यात्रेत कुस्त्यांची भव्य दंगल आयोजित करण्यात आली आहे. दुपारी १२ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाचे उद्घाटन नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते होणार असून आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची विशेष उपस्थिती असेल. आ. बाबुराव कदम कोहळीकर, आ. भीमराव केराम, लोहा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी दशरथ आडेराघो यांची उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्र केसरीच्या धर्तीवर माळेगाव यात्रेत विजेत्या मल्लास माळेगाव केसरी हा सन्मान प्रदान केला जातो. नांदेडसह विविध राज्यांतून कुस्तीपटू मोठ्या संख्येने या स्पर्धेत भाग घेणार आहेत. माळेगावच्या लाल मातीत कुस्ती रंगणार असून या कार्यक्रमात सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**पशु प्रदर्शन व दुग्ध स्पर्धा बक्षीस वितरण**

माळेगाव यात्रेनिमित्त पशु प्रदर्शन, दुग्ध स्पर्धा, कृषी तसेच स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना आज माळेगाव यात्रेत बक्षीस वितरण केले जाणार आहे. सकाळी ११ वाजता होणाऱ्या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. यावेळी बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. आ. डॉ. तुषार राठोड, आ. बालाजीराव कल्याणकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. बक्षीस वितरण सोहळ्यानंतर माळेगाव यात्रेचा समारोप होईल. जिल्हा परिषदेच्या वतीने आज होणाऱ्या दोन्ही कार्यक्रमात यात्रेकरूंनी नागरिकांनी व स्पर्धकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## रस्ते सुरक्षा विषयक वाहन चालकांना प्रशिक्षण शिबीर संपन्न

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०३, मिरा भाईंदर :** नुकताच रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या वाहन चालक कर्मचारी प्रशिक्षण शिबिर केंद्राचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. वाहन चालन प्रशिक्षण आणि संशोधन संस्था, पुणे यांच्यामार्फत सदरचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. सध्या वाढत असलेल्या शहरीकरणाचा परिणाम म्हणून वाहनांची संख्या, गर्दी वाढत आहे. अशा स्थितीत बस चालकांवर ताण येतो. वाहन चालकांना रोज या आव्हानांना सामोरे जावे लागते. अशा स्थितीत सतत दक्ष राहावे लागते, ज्यामुळे मानसिक ताण येतो. ताणाचे व्यवस्थापन आणि रस्ते-वाहतुकीबाबतच्या इतर बाबींवर ४ दिवसीय प्रशिक्षण, वाहन चालन प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेमार्फत देण्यात येत आहे. अनेक ठिकाणी वाहतूक अपघात होत असतात. मिरा भाईंदर महापालिका परिवहन उपक्रमाचे चालक स्वस्थ असावेत तसेच त्यांनी तणावमुक्त राहून कार्य केले पाहिजे यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे असे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी सांगितले.

## क्रांती ज्योती सावित्रीबाई फुलेंची जयंती साजरी

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.03, :** दिनांक ०३ जानेवारी २०२५ रोजी ॲड. किरण म्हात्रे ह्यांच्या वसई कोर्ट जवळील असलेले कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जयंतीनिमित्त माणुसकी फाउंडेशन (सरकार मान्य) यांचे तर्फे कार्यक्रम ठीक ४ वाजता साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमात स्व. सावित्रीबाई फुले ह्यांच्या प्रतिमेस फुल अर्पण करून दीप प्रज्ज्वलित करण्यात आले.सदर कार्यक्रमात एडवोकेट आसिफ नासिर शेख, (वकील उच्च न्यायालय, मुंबई) यांच्या सॉल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. माणुसकी फाउंडेशनचे अध्यक्ष घनश्याम आंबोकर व सचिव राजेश जाधव एडवोकेट सबा शेख (उच्च न्यायालय, मुंबई) ज्योती तांबे, एडवोकेट किरण म्हात्रे, (उच्च न्यायालय, मुंबई) खिदमतूल मूसलेमिन ट्रस्टचे संस्थापक / अध्यक्ष फिरोज इब्राहिम खान, समाजसेवक व क्रिकेटर शेखर म्हात्रे, समाजसेवक विजय गोडबोले तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पुढील कार्यक्रमाची रूपरेषा बाबत चर्चा करण्यात आली.

# दिवा अनधिकृत बांधकाम मुक्त झाला पाहिजे

## दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांवर भ्याड हल्ला करणाऱ्यांचा जाहीर निषेध : रोहिदास मुंडे

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०४, दिवा (ठाणे) :** दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त भालचंद्र घुगे यांनी दिवाळीनंतर समितीचा पदभार हातात घेतल्यावर त्या भागात सुरू असणारी अनधिकृत बांधकामे व फेरीवाले यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीने कारवाई चालू केल्या होत्या. त्यातच एका अनधिकृत बांधकामावर कारवाई दरम्यान आयुक्तांवर दोघांनी भ्याड हल्ला केला. या हल्लयाचा उबाठा गटाचे दिवा शहर



संघटक रोहिदास मुंडे यांनी जाहीर निषेध नोंदवला आहे.

दिव्यावर अनधिकृत बांधकामांचा ठप्पा लागलेला असून तो ठप्पा काढण्यासाठी येणारे प्रत्येक सहाय्यक आयुक्त प्रयत्न करत असतात. पण या अशा बऱ्याच कारवाई दरम्यान त्यांना नागरिकांच्या रोशाला, नाराजीला सामोरे जावे लागते. त्यातच काल शिळफाटा येथे एका इमारतीवर कारवाई करत असताना बिल्डराकडून त्यांच्यावरती भ्याड हल्ला करण्यात आला. यात त्यांना किरकोळ दुखापत झाली असून सुदैवाने ते व्यवस्थित आहेत. परंतु अशा भ्याड हल्ला करणाऱ्यांवर पोलिसांकडून व महापालिकडून कठोर कारवाई झाली पाहिजे. दिवा प्रभाग समिती अंतर्गत चालू असणाऱ्या अनधिकृत बांधकाम व फेरीवाले यांच्यावर कठोर कारवाई झाली होऊन अनधिकृत बांधकाम व अनाधिकृत फेरीवाले मुक्त अशी प्रभाग समिती झाली पाहिजे. या भ्याड हल्ला करणाऱ्यांचा आम्ही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून जाहीर निषेध करतो. असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र शासन, केंद्र शासनाच्या भूखंडावरील अनाधिकृत बांधकामावर कारवाई

## कारवाई फक्त नावालाच का ? स्थानिक नागरिकांचा सवाल



६०, ६३, ६५, ६६ सातबारा महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकारचे नावे असलेला भूखंडावर अनाधिकृत बांधकाम यावर कारवाई करण्यासाठी मनसेचे शिळ देसाई विभाग अध्यक्ष शरद पाटील यांनी ठाणे महानगरपालिका, वनविभाग, औद्योगिक विकास महाविकास मंडळाकडे निवेदन देऊन अधिकाऱ्यांना त्यांच्या निदर्शनास आणून दिले. शेवटी ठाणे महापालिकेने त्यांच्या पत्राची दखल घेतली आणि कारवाई केली. पण पुन्हा एकदा हे भूखंड अनाधिकृत बिल्डर यांच्या घशात गेले. खरंतर हे भूखंड शासनाने आपल्या ताब्यात घ्यायला हवं होतं. असे मनसे विभाग अध्यक्ष शरद पाटील म्हणाले आहेत.

संतोष भोईर यांनी असेही म्हटले आहे की, १० गाळ्यावर कारवाई होते. त्याच्या बाजूला असलेल्या अग्निशामक केंद्राच्या स्थानकाच्या बाजूला, शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी अनाधिकृत कार्यालय बांधले आहे. त्या ठिकाणी ठाणे महानगरपालिका कारवाई करत नाही. ते बांधकाम ठाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना का दिसत नाही? एका ठिकाणी कारवाई करायची आणि दुसऱ्या ठिकाणी, कारवाई करायची नाही हा कुठला न्याय!

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०४, शिळफाटा (ठाणे) :** एक वर्षा अगोदर सहायक आयुक्त अक्षय यांनी शिळ फाटा येथील गावदेवी मंदिरासमोर असलेल्या अनाधिकृत १० गाळ्यावर कारवाई केली होती. तसेच महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकारच्या नावे असलेल्या सातबारा भूखंडावर ६०, ६३, ६५, ६६ अनाधिकृत आरसीसीच्या बांधकामावर कारवाई सुद्धा केली होती. पुन्हा एकदा २ जानेवारी २०२५ रोजी दुपारी २ वाजता. दिवा प्रभाग समितीचे भालचंद घुगे यांनी कारवाई केली.

कारवाई चालू असताना भालचंद घुगे यांच्यावर हल्ला सुद्धा झाला होता. त्याच भूखंडावर दुसरा दिवशी बिल्डराने त्या जागेवर लोखंड पत्राचे कुपन टाकून ताब्यात घेतली आहे. आता त्या भूखंडावर झाडांची कत्तल करून पुन्हा अनाधिकृत बांधकाम चालू झाले आहे. शील फाटा परिसरातील स्थानिक नागरीक संतोष भोईर यांनी असा आरोप केला आहे.

सहाय्यक आयुक्तांनी सुपारी घेऊन अनाधिकृत बांधकामावर कारवाई केली आहे. महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकारच्या नावे असलेल्या भूखंड, आणि गोरगरीब गाळेधारक यांचा भूखंड बिल्डरच्या घशात घालण्यासाठी कारवाई केली होती का? असा आरोप संतोष भोईर यांनी केला आहे.

# तलासरी मधील कंपनीतील सांडपाण्याच्या दुर्गंधीने नागरिक त्रस्त

## सांडपाणी व्यवस्थापन २ महिन्यात करण्याचं कंपनीचं आश्वासन




**सेटवाला फुड्स कंपनी व्यवस्थापक**

कंपनीत प्रदुर्षण मंडळाच्या नियमा प्रमाणे सांडपाणी प्रक्रिया व्यवस्थापन प्रकल्प (ई.टी.पी) सुरु आहे. आमच्या कंपनीसाठी १० हजार लिटर क्षमतेची सांडपाणी प्रक्रिया टाकी असणे गरजेचे असताना क्षमतेपेक्षा जास्त ३० हजार लिटर क्षमतेची बनविली आहे. परंतु संरक्षक भिंत पडल्यामुळे काही प्रमाणात सांडपाणी नदीचा ओहोळामध्ये जात असेल तर आम्ही येत्या दोन महिन्यात काम पूर्ण करून स्थानिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेऊ

दुषित हवा आणि पाण्यामुळे लहानमुले, स्त्रिया यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कंपनीमुळे याभागातील कामगारांना रोजगार मिळत आहे परंतु आमचा उद्देश कंपनी बंद करण्याचा नसून नागरिकाच्या समस्येवर तोडगा काढण्यात यावा.

**सुनील ठाकरे (ग्रामस्थ)**

रात्री अप रात्री चिकन कंपनीतून सांडपाणी नदीच्या ओहोळात सोडण्यात येते यामुळे गावातील बोरवेल विहिरी यांचे पाणी दूषित झालेले आहे तसेच त्वचारोग नागरिकांना होत आहेत ओहोळ पूर्णपणे प्रदूषित झाल्याने नागरिकांना आरोग्याच्या समस्या देखील सतावत आहेत.

**कुंदन ठाकरे (स्थानिक ग्रामस्थ)**

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०४, तलासरी (पालघर) :** तालुक्यातील मौजे वडवली नवापाडा येथे असलेल्या सेटवाला फुड्स प्रा.लि या मांसाहारी खाद्यपदार्थ बनविणाऱ्या कंपनीत चिकन पासून निरनिराळे पदार्थ तयार केले जातात. कंपनीत दररोज पोल्ट्री फार्म मधून येणाऱ्या हजारो कोंबड्यांची स्वयंचलित यंत्रावर कत्तल करुन खाद्यपदार्थ बनविण्यासाठी वापरले जाते. स्वयंचलित यंत्रावर कापलेल्या कोंबड्यांची साफसफाई करताना निघणारे सांडपाणी व रक्त कंपनीतील सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प (ई.टी.पी) मध्ये साठवण्यात येऊन त्यावर प्रक्रिया करण्यात येते.परंतु कंपनीतून कोंबड्यांची निघणारी घाण आणि सांडपाणी यामुळे गावपाड्यात दुर्गंधी पसरली असून कंपनी लगत असलेल्या ओहळ तसेच विहारीतील पिण्याचे पाणी दुषित झाल्याने पाड्यात राहणाऱ्या नागरिकांच्या व लहान मुलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. तसेच परिसरात घाण दुर्गंधी मुळे जगणे असह्य झाल्याचे नागरिकांचे म्हणणे असून दुषित पाण्यामुळे महिला, मुलांना त्वचा रोग, कावीळ इत्यादीचा रोगाची लागण होत आहे.

याबाबत ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयाचे वारंवार उंबरठे झिजवूनही आणि निवेदन देऊनही कुठलीच कारवाई होत नसल्याने नाराज नागरिकांनी शुक्रवारी कंपनी समोर दूषित पाणी भरून आणत कारवाई करण्याची मागणी करत दूषित पाणी नदी ओहळ मध्ये या पुढे पुन्हा सोडल्यास आंदोलन छेडणार इशारा दिला आहे. कंपनीत सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प आहे. परंतु कंपनीची संरक्षण भिंत काही महिन्यापूर्वी पडल्यामुळे कंपनीतील सांडपाणी झिरपून पाण्यात मिसळत असल्याने पाणी दुषित होत असल्याचे प्रथम दर्शनी दिसत असले तरी पाण्याची तपासणी केल्यानंतर पाणी वापरण्यायोग्य आहे कि अयोग्य हे स्पष्ट होईल.

यामुळे सदर कंपन्यातील सांडपाणी नदीच्या ओहोळ मध्ये सोडण्यात येऊ नये अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली असून तातडीने जर हे बंद केले नाही तर याला सर्वस्वी कंपनी जबाबदार राहील असा इशारा दिला आहे. तर याबाबत कंपनी व्यवस्थापनाकडून सांडपाणी आणि संरक्षक भिंतीचे काम दोन महिन्यात पूर्णत्वास नेऊन स्थानिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेणार असल्याचे आश्वासन दिले आहे.

# श्री ढोकेश्वर विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** दिनांक ०३ जानेवारी २०२५ रोजी श्री ढोकेश्वर विद्यालय टाकळी ढोकेश्वर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य सुनील वाव्हळ व पर्यवेक्षक बाळासाहेब खिलारी आणि शिक्षक वृंद




यांनी केले. याप्रसंगी विद्यालयाचे मराठी विषय शिक्षक रवींद्र मते व अनेक विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या जीवन कार्याबद्दल माहिती सांगितली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अध्यक्ष निवड श्रीम. जाधव यांनी केले. अनुमोदन गायखे यांनी केले तर आभार प्रदर्शन नीलम खिलारी यांनी केले. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ शिक्षक मल्हारी वाघस्कर,बाळासाहेब निवडुंगे, बाबासाहेब जाधव, अतुल सैद, नारायण शेळके, रवि ज्योतिक, महांडुळे, खत्रे, सुशांत खेडकर, वाळुंज, प्रिया डव्हणे, भोंडवे यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मध्य रेल्वे तसेच ट्रान्स हार्बरवर आज मेगा ब्लॉक

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि ०४, मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी १०.१४ ते दुपारी ३.५२ वाजेपर्यंत डाऊन धीम्या मार्गावरील सेवा माटुंगा आणि मुलुंड स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवण्यात येऊन शीव, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडुप आणि मुलुंड स्थानकांवर थांबतील व पुढे मुलुंड डाऊन धीम्या मार्गावर वळवण्यात येतील आणि निर्धारित वेळेच्या १५ मिनिटे उशीरा गंतव्यस्थानावर पोहोचेल. ठाणे येथून सकाळी ११.०७ ते दुपारी ३.५१ वाजेपर्यंत सुटणाऱ्या अप धीम्या मार्गावरील गाड्या मुलुंड आणि माटुंगा स्थानकांदरम्यान अप जलद मार्गावर वळवल्या जातील व यादरम्यान मुलुंड, भांडुप, विक्रोळी, घाटकोपर, कुर्ला आणि शीव येथे थांबतील व पुढे अप धीम्या मार्गावर वळविण्यात येतील आणि निर्धारित वेळेच्या १५ मिनिटे उशीरा गंतव्यस्थानावर पोहोचेल.




पनवेल येथून सकाळी १०.३३ ते दुपारी ३.४९ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबईच्या दिशेने सुटणाऱ्या अप हार्बर मार्गावरील सेवा आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी ९.४५ ते दुपारी ३.१२ वाजेपर्यंत पनवेल/बेलापूरच्या दिशेने सुटणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील सेवा बंद राहतील. पनवेल येथून सकाळी ११.०२ ते दुपारी ३.५३ वाजेपर्यंत ठाण्याकडे जाणारी अप ट्रान्सहार्बर लाईन सेवा आणि ठाणे येथून सकाळी १०.०१ ते दुपारी ३.२० वाजेपर्यंत पनवेल येथे जाणारी डाउन ट्रान्सहार्बर लाईन सेवा बंद राहणार आहे.

ब्लॉक कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - वाशी भागावर विशेष लोकल चालतील. ब्लॉक कालावधीत ठाणे - वाशी/नेरुळ स्थानकांदरम्यान ट्रान्स-हार्बर लाईन सेवा उपलब्ध असेल. ब्लॉक कालावधीत बेलापूर/नेरूळ आणि उरण स्थानकांदरम्यान पोर्ट लाईन सेवा उपलब्ध असेल. मेगा ब्लॉक हा पायाभूत सुविधांच्या देखभाल आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक आहे. प्रवाशांना विनंती करण्यात येत आहे की रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे.

# जिल्ह्यात 'स्वच्छ माझे अंगण' अभियान सुरू

## वैयक्तिक शौचालयाचा वापर, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करणाऱ्या कुटूंबांचा होणार गौरव

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, ठाणे :** कुटुंब स्तरावर वैयक्तिक शौचालय, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन स्वच्छतेची सवय अंगीकृत करणे, नियमितपणे वापर करणाऱ्या कुटुंबांना प्रोत्साहन देणे, त्यांचे अनुकरण करण्याकरीता इतर ग्रामस्थांना, कुटुंब धारकांना त्यांच्याप्रमाणे वैयक्तिक स्वच्छता सुविधा आपल्या घरात किंवा परिसरात उपलब्ध करून घेण्यासाठी ठाणे जिल्ह्यामध्ये दि.१ ते २० जानेवारी २०२५ या कालावधीत 'स्वच्छ माझे अंगण' अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

स्वच्छ भारत मिशन (प्रा.) टप्पा २ अंतर्गत कुटुंब स्तरावर वैयक्तिक शौचालय, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत जिल्ह्यात ज्या कुटुंबानी वैयक्तिक शौचालय वापर, सांडपाणी व्यवस्थापनासाठी शोषखड्डा, परसबाग, पाझर खडा, घनकचरा व्यवस्थापनाकरीता कंपोस्ट खत खड्डा अथवा घरगुती खत खड्डा तसेच कुटुंब स्तरावर कचराकुंड्या या बाबतची उपलब्धता करून घेतले, अशा कुटुंबांना प्रोत्साहन देत इतरही कुटुंबांनी त्यांचे अनुकरण करण्याच्या उद्देशाने हे अभियान राबवण्यात येत आहे.

देखभाल दुरुस्ती करण्यासाठी कुटुंबाने पुढाकार घेणे, घरगुती स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण करणे, कुटुंब स्तरावर सुका, ओला कचराकुंड्या मध्ये वर्गीकरण करणे, वर्गीकरण केलेल्या घरगुती कचऱ्याचे कंपोस्ट खत खड्डा किंवा घराच्या परिसरात व्यवस्थापन करणे, परसबाग, पाझरखड्डा, शोषखड्याद्वारे घरगुती स्तरावर सांडपाणी व्यवस्थापनावर अभियानात विशेष भर देण्यात येत आहे.

सर्व प्रथम अभियानाची माहिती दवंडी देऊन, गावातील सूचना फलकांवर लावून गावात ग्रामस्थांना माहिती देण्यात येत आहे. दि.२१ ते २४ या कालावधीत पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फतीने वैयक्तिक स्तरावर शौचालयाचा वापर, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करणाऱ्या कुटूंबांची पडताळणी करून कुटूंबांची निवड करण्यात येणार आहे. ज्या कुटूंबाची निवड करण्यात येणार, त्यांच्याकडे किंवा परिसरात घरगुती खतखड्डा, परसबाग, वैयक्तिक शोषखड्डा, पाझर खड्डा, वैयक्तिक शौचालय, घरगुती कचराकुंड्या आदी सुविधा असणे आवश्यक आहे.

उत्कृष्ट व्यवस्थापन करणाऱ्या कुटबांना दि. २६ जानेवारी, २०२५ रोजी ग्रामसभेमध्ये सरपंच व ग्राम पंचायत अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीने प्रशस्तीपत्र, श्रीफळ, पुष्प देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे. 'स्वच्छ माझे अंगण' अभियान अंमलबजावणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.) प्रमोद काळे यांचे नेतृत्वात करण्यात येत आहे. सर्व पंचायत समितीस्तरावर गटविकास अधिकारी यांना पत्रव्यवहार करण्यात आला असून गावस्तरावर स्वच्छ माझे अंगण अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

# राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत प्रा.अमीर इनामदार द्वितीय

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०३, खंडाळा (सातारा)** : सत्यशोधक विद्यार्थी महाराष्ट्र धुळे आयोजित २६ नोव्हेंबर संविधान दिन व २८ नोव्हेंबर २०२४ महात्मा ज्योतिबा फुले स्मृतिदिन निमित्त आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत पश्चिम महाराष्ट्र विभागात सुशिला शंकरराव गाढवे

महाविद्यालय खंडाळा मधील राज्यशास्त्र विभागात कार्यरत असणारे प्रा.अमीर इनामदार यांनी द्वितीय क्रमांक पटकवला. त्यांनी भारतीय संविधानापुढील आव्हाने या विषयावर अभ्यासपूर्ण लेखन केले आहे.



०३ जानेवारी २०२५ सावित्रीआई फुले जयंतीचे औचित्य साधत आभासी प्रणाली द्वारे मान्यवरांच्या उपस्थितीत या स्पर्धेचा निकाल जाहिर करण्यात आला. या समारंभासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख व ज्येष्ठ अभ्यासक डॉ. उमेश बगाडे व सत्यशोधक डेम ोक्रेटीक पार्टीचे सचिव कॉ.सिद्धार्थ जगदेव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निबंध स्पर्धा हेतू आणि वैचारिक चळवळ भूमिका विवेचन करताना करताना डॉ.बगाडे म्हणाले-जगण्याच्या प्रवाहात चिकित्सा करण्याची तऱ्हा भिन्न स्वरूपाच्या असतात. निबंध स्पर्धे तील विशिष्ट विषयावर सखोल विचार व्यक्त करण्यासाठी वाचन, आकलन, चिकित्सा, चिंतन ची गरज पूर्ण करून लिहिणारे व्यक्त होतात. निबंध स्पर्धे तून प्रत्येक स्पर्धक स्व बोधाच्या जाणीवेतून व्यक्त झालाय,याबद्दल सर्व स्पर्धकांचे अभिनंदन केले. कॉ.सिद्धार्थ जगदेव म्हणाले-सत्यशोधक विद्यार्थी संघटना गेली ४० दशके विद्यार्थी जडणघडणं आणि न्याय हक्कासाठी काम करत, सामाजिक-सांस्कृतिक-शैक्षणिक लढे उभे करत आलीय निबंध स्पर्धा निमित्त विचारी माणसांना जोडता आले. याचा आनंद आहेया समारंभाचे प्रास्ताविक माजी राज्य सचिव विकास मोरे यांनी,परिचय जयेश पठाडे यांनी, आभार दीपाली भालेराव, निवेदन राज्य सचिव तुषार सूर्यवंशी यांनी केले. प्रा.भूषण धनगर,विजय वाघ,वर्षा बढे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.प्रा. अमीर इनामदार यांनी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी कॉलेज,सातारा आयोजित राज्यस्तरीय बोलीभाषा काव्यलेखन स्पर्धेत इलाक्शनचं धुमशान ही कविता लिहिली आहे,वर्डालय मीडिया आणि पब्लिकेशन हाऊस आयोजित राष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेत लोकशाहीस पत्र वैचारिक लेख लिहिला आहे. तसेच जनअभिव्यक्त जाहिरनामा,पुढारी व्हिजन फोरम मध्ये सातारा जिल्ह्याच्या विकासाचा १२ कलमी शाश्वत आराखडा असे वैचारिक-सर्जनशील लेख तसेच ग्रामीण विनोदी कथा प्रसिद्ध आहेत. राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतील यशाबद्दल प्रा. इनामदार यांना मान्यवर,विद्यार्थी शुभचिंतक यांचेकडून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# शंकरपटाच्या लोकप्रियतेवर माळेगावच्या गर्दीचे शिक्कामोर्तब

## हजारो शेतकऱ्यांनी अनुभवला ५८ बैल जोड्यांचा ६ तास थरार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, नांदेड** : लाईन क्लिअर...जोडी सोडा... जोडी मालकासाठी खुशखबर... ३ सेकंद ३८ पॉईंट आणि वायुगतीने... विक्रमी वेळेत अंतर पार... पाठोपाठ शेतकऱ्यांच्या टाळ्या शिट्ट्या... अशा माळेगावच्या माळरानावरील धावत्या समालोचनात ५८ बैल जोड्यांनी डोळ्यांचे पारणे फेडणारा थरार रचला. शंकर पटाच्या गर्दीने हा खेळ तुफान लोकप्रिय असल्याचे पुन्हा एकदा शिक्काम ोर्तब केले. शेती, मातीत रमणाऱ्या शेतकऱ्यांचा माळेगावचा शंकरपट म्हणजे जीव की प्राण. न्यायालयाच्या निर्णयानंतर गेल्या वर्षीपासून पुन्हा बैलगाड्यांच्या शर्यतीला सुरुवात झाली आहे. बंदी उठल्यावरचा आजचा माळेगावचा दुसरा शंकरपट. आज गर्दीचे सर्व उच्चांक मोडत माळेगावात म राठवाडा, विदर्भातील तसेच बाजूच्या राज्यातील शेतकऱ्यांनी या शंकरपाटासाठी गर्दी केली होती. महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यातून यासाठी बैलजोडी आल्या होत्या. त्यामुळे यंदाचा शंकरपठ अतिशय चुरशीचा गर्दीचा आणि उत्कंठेचा ठरला आहे. माळेगावात शनिवार, दिनांक ०४ जानेवारी २०२५ रोजी दुपारपासून ५८ जोडीनी आपले कसब दाखविले. सायंकाळी साडेपाच पर्यंत हा थरार सुरू होता. माळेगावच्या यात्रेला आज एक आठवडा झाला. २९ डिसेंबरच्या पालखी यात्रेनंतर सुरू झालेली माळेगावची यात्रा आज शंकर पटाने गाजवली उद्या माळेगाव यात्रेची आणखी एक परंपरा असणाऱ्या कुस्तीच्या फडाने शासकीय कार्यक्रमाची सांगता होणार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनीही आज शंकरपटाचा आनंद घेतला. त्यानंतर आमदार बालाजी कल्याणकर यांनी देखील यात्रेला भेट दिली. तत्पूर्वी आज या कार्यक्रमाचे उद्घाटन आ. आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, पोलीस अधिकारी अश्विनी जगताप, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, नरेगाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, पोलीस निरीक्षक संजय नीलपत्रेवार, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडीलवार, सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त डॉ. दिनेश महेर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा पशु संवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले, जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके, सरपंच प्रतिनिधी हनुमंत धुळगंडे, गट विकास अधिकारी दशरथ आडेराघो, पंचायत समितीचे माजी सभापती आनंदराव शिंदे, अंबादास जाहागीरदार, अशोक मोरे, नरेंद्र गायकवाड, उद्धव शिंदे, विस्तार अधिकारी धनंजय देशपांडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रारंभी खंडोबाच्या प्रतिमेचे पूजन करून दुपारी एक वाजता शंकरपट शर्यतीला सुरुवात झाली. या शर्यतीसाठी नांदेडसह पालम, गंगाखेड, पूर्णा, परभणी, लातूर, अहमदपुर, हिंगोली आदी ठिकाणांहून ५८ बैलजोड्या सहभागी झाल्या होत्या. वेगवान धावणाऱ्या बैलजोड्यांची उपस्थित लाखो प्रेक्षकांना अक्षरशः थक्क केले. शेतकऱ्यांसाठी ही स्पर्धा केवळ मनोरंजन नाही तर त्यांच्या मेहनतीचा व बैलांवरील प्रेमाचा सन्मान असल्याचे यावेळी एका शेतकऱ्यांनी बोलून दाखवले. पंच म्हणून जनार्दन मंदाडे व नागेश मंदाडे यांनी काम पाहिले.शंकरपटाचे पहिले पारितोषिक ३१ हजार, द्वितीय २१ तर तृतीय पारितोषिक ११ हजार रुपये आहे.तसेच काही जणांना प्रोत्साहनपर बक्षीस दिले जातात. रविवारी बक्षीस वितरण तसेच कुस्त्यांची दंगल माळेगावला उद्या शासकीय कार्यक्रमांच्या आयोजनाचा समारोप होणार आहे. उद्या दुपारी माळेगाव येथे गेल्या आठवड्यात आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा पार पडणार आहे. तसेच उद्या कुस्तीची दंगल देखील पार पडणार आहे.

# थोडक्यात

## सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विद्यार्थांनी झाडाच्या पानावर चित्र काढून वाहिली आदरांजली




**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०३, कल्याण (ठाणे)** : सावित्रीबाई फुले जयंतीचे औचित्य साधून कल्याण येथील नूतन विद्यालयाच्या विद्यार्थिनी झाडाच्या पानावर चित्र काढून आदरांजली वाहिली. निरक्षर स्त्री शिक्षण घेईल. शिक्षिका बनेल आणि वर्षानुवर्ष त्रस्त असलेल्या स्त्रिया आणि शूद्रांसाठी अज्ञानाचा अंधार दूर करेल ही कल्पना भारतीय इतिहासाच्या दोन सहस्त्र वर्षात अतुलनीय आहे. याचेच औचित्य साधून नूतन विद्यालयातील विद्यार्थांनी शालेय परिसरातील बदामाच्या झाडाच्या पानावर सावित्री बाईंचा रंगीत खडू व रंगाने चित्र रंगविले. यामध्ये पोस्टर कलर खडूचा उपयोग करून २ तासात झाडाच्या पानावर चित्र काढले. शाळेतील उपक्रमशील शिक्षक कलाशिक्षक श्रीहरी पवळे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता सातवी, आठवीच्या विद्यार्थिनी झाडाच्या पानावर हुबेहूब चित्र रेखाटले हा उपक्रम लक्षवेधी ठरला. विद्यार्थ्यांबरोबर शिक्षिका-शिक्षक ही सहभागी झाले होते. शाळेच्या मुख्याध्यापिका रेश्मा सय्यद यांनी विद्यार्थिनी व कलाशिक्षक श्रीहरी पवळे यांचे कौतुक केले. असे कार्यक्रम शाळा राबवत असल्यामुळे कल्याण परिसरातून शाळेचे कौतुक होत आहे.

## सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिला राष्ट्रवादी कांग्रेस तर्फे अभिवादन



**अक्षराज : रजत डेकाटे**

**दि.०३, भिवापूर (नागपूर)** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नागपूर शहर महिला आघाडी तर्फे कॉटन मार्केट चौक नागपूर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त नागपूर शहर महिला अध्यक्षा सुनिता येरने यांच्या हस्ते त्यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून विनम्र अभिवादन करण्यात येणार आहे. यावेळी सूनिता येरणे यांनी सांगीतले की सावित्रीबाई फुले या मराठी कवयित्री, समाजसुधारक आणि शिक्षिका होत्या. त्यांनी व त्यांचे पती ज्योतिबा फुले यांनी महिला हक्क आणि शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. मुलींच्या शाळेत सावित्रीबाई फुले या पहिल्या म हिला शिक्षिका होत्या. त्या आजच्या जगातील मराठी महाकाव्याची अग्रदूत कवयित्री म्हणून ओळखल्या जातात. यावेळी रेखा चरडे दक्षिण अध्यक्ष,शोभा येवले नागपूर शहर उपाध्यक्ष, कणीजा बेगम शेख नागपूर शहर महासचिव, सविता रंगारी नागपूर शहर सचिव, संगीता अंबारे नागपूर शहर सचिव, सहाना मोसिन, नीलफोर प्रवीणा आदी महिला पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होत्या.

## सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०३, महापे (नवी मुंबई)** : सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे (बालिका दिवस)औचित्य साधून अभिनव युवा शिक्षक संस्था, नवी मुंबई मार्फत अभिनव विद्यार्थी दत्तक योजनेच्या लाभार्थी २२ विद्यार्थ्यांना नवी मुंबई मनपा शाळा क्र. ४०, महापे येथे व नवी मुंबई मनपा शाळा क्र.३१ कोपरखैरणे येथील २५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य किटचे वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास नगरसेवक चंद्रकांतदादा पाटील, विस्तार अधिकारी चंद्रप्रकाश पाल, मुख्याध्यापक रवींद्र म्हात्रे व रुपाली गावंड, वरिष्ठ शिक्षक मारुती गवळी, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका संगिता दुबे तसेच शाळा क्र. ४० महापेचे व कोपरखैरणेचे सर्व शिक्षक व कर्मचारीवृंद यांचे अनमोल सहकार्य लाभले. या कार्यक्रमास अभिनव युवा शिक्षक संस्थेचे सर्व सदस्य आवर्जून उपस्थित होते. दरवर्षीप्रम ाणे या ही वर्षी नवी मुंबई महापालिकेतील एकल पालकत्व किंवा आई-वडील नसलेल्या महापालिकेत शिकत असलेल्या १५० विद्यार्थ्यांना अभिनव विद्यार्थी दत्तक योजनेअंतर्गत शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात येत आहे. याच अनेक शिक्षकाने सावित्रीबाई व साने गुरुजी यांच्याकडून प्रेरणा घेऊन या गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कीट वाटपासाठी स्वतः आर्थिक सहकार्य केले.

## कौठा येथे सावित्रीबाई फुले यांना अभिवादन



**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.०३, श्रीगोंदा (अहिल्यानगर)** : सावित्रीबाई फुले यांच्या जयंती व महिला मुक्ती दिनानिमित्त कौठा ता.श्रीगोंदा येथे आयोजित कार्यक्रमात प्राचार्य श्री.ठुबे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी बोलताना सावित्रीबाई फुले यांच्या विषयी शिक्षण क्षेत्रातील व महिला वर्गासाठी केलेल्या भरीव कामगिरीचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तरी तसेच या कार्यक्रमाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे विद्यार्थ्यांना सामाजिक जीवनामध्ये व्यवहारिक ज्ञान यावे यासाठी आनंदी बाजार ही भरवण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणपतराव परकाळे होते. यावेळी स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष सुभाषराव परकाळे, उपाध्यक्ष नम्रता सुपेकर, शंकरराव गायकवाड, हनुमंत परकाळे, संतोष परकाळे, नितीन शिपलकर, भरत सुपेकर, बाळासाहेब माने, बाळासाहेब पवार, गजानन गावंडे, शीतल परकाळे, सोनल गवांडे, खोलम, विद्यार्थी, पालक, महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कौठा येथील सर्व शिक्षक वृंदानी परिश्रम घेतले.